# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १ जून, २०२२

---

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्राधिकरण निवडणूक प्रक्रीयेला प्रारंभ झाला असून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चे कलम २६ मध्ये नमूद केलेल्या विविध प्राधिकरणांच्या विद्यमान सदस्यांची पाच वर्षांची मुदत ३१ ऑगस्ट २०२२ रोजी समाप्त होत आहे. या कायद्याच्या कलम ६२(१) नुसार प्रत्येक नवनियुक्त प्राधिकरणांच्या सदस्यांची मुदत १ सप्टेंबर २०२२ पासून दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ या कालावधीसाठी असेल. या प्राधिकरणांच्या निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रीया सुरु करण्याचे कुलगुरुंनी निर्देश दिले आहेत. निवडणूकी संदर्भातील संपूर्ण माहिती, अधिसुचना व इतर अनुषंगिक पत्रव्यवहार हा विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावरील www.nmu.ac.in/election या पोर्टलवर तसेच मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील कक्ष क्र.४०७ च्या बाजूला असलेल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच निवडणूकीसंदर्भातील सर्व पत्रव्यवहार हा वरील संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाणार असून त्याचे अवलोकन व नोंद घेण्याची जबाबदारी संबंधितांची असेल.

निवडणूक विभागप्रमुख म्हणून डॉ.एस.आर.भादलीकर हे काम पाहणार असून निवडणूकीसंदर्भातील मूळ कागदपत्रे व पत्रव्यवहार डॉ.एस.आर.भादलीकर, निवडणूक विभाग प्रमुख तथा उपकुलसचिव (विधी /माहितीचा अधिकार) कक्ष क्र.४१० तिसरा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, कबचौउमवि, जळगाव येथे स्वीकारला जाईल. तरी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था व सायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर, यांनी नोंद घ्यावी असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव यांनी केले आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पारेषण संलग्न सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून शनिवार दि.४ जून रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते प्रकल्प उभारणीस प्रारंभ होणार आहे.

जळगाव जिल्हा नियोजन व विकास समितीने या ६५० किलोवॅट सौर उर्जा प्रकल्पासाठी ३ कोटी ६६ लाख ७१ हजार ९६० रुपयांचा निधी दिला आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. या प्रकल्पाचा उभारणी

सोहळा शनिवार दि. ४ जून रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पालकमंत्री श्री. गुलाबराव पाटील उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत तसेच प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे उपस्थित राहतील. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा) ही या प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहत आहे अशी माहिती प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी